**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**निवडणूक विभाग**
**सार्वत्रिक निवडणूक - २०२२**
**परिशिष्ट ९**
**(अंतिम प्रभाग रचना प्रस्ताव तपासणी झाल्यावर द्यावयाचे)**
**प्रमाणपत्र — प्रारुप प्रभाग रचना**

महानगरपालिकेचे नाव : **नाशिक महानगरपालिका, नाशिक**

प्रमाणित करण्यात येते की, नाशिक महानगरपालिकेच्या सन २०२२ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१. जनगणना कार्यालयाकडून प्राप्त सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे वापरण्यात आलेले आहेत.

२. ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही (त्या आशयाचे संचालक, जनगणना कार्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे.

३. प्रत्येक प्रभागामध्ये येणारे प्रगणक गट, नकाशानुसार त्याच प्रभागामध्ये समाविष्ट आहेत.

४. गुगल अर्थ किंवा तत्सम संगणकीकृत नकाशांच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आली आहे.

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ तसेच त्याअंतर्गत नियम व राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

६. प्रभागांच्या हद्दींचे वर्णन, व्याप्ती, लोकसंख्या व आरक्षण योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

७. प्रारुप प्रभाग रचना उपलब्ध माहितीच्या आधारावर नि:पक्षपातीपणे तयार करण्यात आली आहे.

ठिकाण : नाशिक

दिनांक १२/०५/२०२२

| | | |
|---|---|---|
| (हर्षल बावीस्कर) | (मनोज घोडेपाटील) 12/05/22 | (रमेश पवार) 12/5/22 |
| उप संचालक, नगररचना | उपआयुक्त (प्रशासन) | आयुक्त, |
| नाशिक महानगरपालिका, नाशिक | नाशिक महानगरपालिका, नाशिक | नाशिक महानगरपालिका, नाशिक |